**कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. :- आयटीआय-२०२०/ प्र.क्र. १२७/व्यशि-३, दि. ०३ जून २०२१ चे सहपत्र**

**शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना विहीत केलेल्या विद्यावेतनाच्या ७५ टक्के विद्यावेतन महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना राज्य शासनाकडून "थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer)" पद्धतीने अदा करण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती (Standard Operating Procedure)**

१. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेची सुलभ, प्रभावी, जलद अंमलबजावणी व संनियंत्रण कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या maps.dvet.gov.in या संकेतस्थळामार्फत ऑनलाईन पद्धतीने करण्यात येईल.

२. सदरील संकेतस्थळ केंद्र शासनाच्या www.apprenticeshipindia.org या संकेतस्थळासमवेत संलग्न करण्याचे विचाराधीन आहे.

३. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत अतिरिक्त विद्यावेतनाचा लाभ "थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer)" पद्धतीने अदा करण्यात येईल.

## १. शिकाऊ उमेदवाराने करावयाची कार्यवाही

१.१ महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत अतिरिक्त विद्यावेतनाचा लाभ प्राप्त करुन घेऊ इच्छिणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना केंद्र शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करुन करार पत्र तयार करणे अनिवार्य आहे.

१.२ महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत अतिरिक्त विद्यावेतनाचा लाभ प्राप्त करुन घेऊ इच्छिणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना राज्य शासनाच्या maps.dvet.gov.in संकेतस्थळावर नोंदणी करणे अनिवार्य आहे.

१.३ राज्य शासनाच्या maps.dvet.gov.in संकेतस्थळावरील " लॉगिन (LOGIN)" या बटनावर क्लिक करा. त्यानंतर "शिकाऊ उमेदवारी नोंदणी (CANDIDATE REGISTRAITION)" या बटनावर क्लिक करा.

१.४ लॉगिन झाल्यानंतर स्वत:ची वैयक्तिक माहिती तसेच शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेसंबंधित सर्व माहिती तपासावी उदा. केंद्र शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावरील शिकाऊ उमेदवारी नोंदणी क्रमांक(Apprenticeship Registration Number), करार पत्र नोंदणी क्रमांक(Contract Registration Number),संपूर्ण नाव (नाव,वडिलांचे/पतीचे नाव, आईचे नाव, आडनाव भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल, तसेच व्यवसायाचे नाव, व्यवसायाचा प्रकार [Designated/Optional/Technician(Votional)], शिकाऊ उमेदवारीचा कालावधी (पासून ते पर्यंत - महिने), प्रशिक्षित/अप्रशिक्षित,शिकाऊ उमेदवारी करार नोंदणी क्रमांक, आस्थापनेचे नाव,प्रतिमहा विद्यावेतनाचा विहीत दर, इत्यादी.

१.५ महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत अतिरिक्त विद्यावेतनाचा लाभ प्राप्त करुन घेऊ इच्छिणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना राज्य शासनाच्या maps.dvet.gov.in संकेतस्थळावर लॉगिन करणे अनिवार्य आहे.

१.६ राज्य शासनाच्या maps.dvet.gov.in संकेतस्थळावर लॉगिन येथे जाऊन शिकाऊ उमेदवाराने,केंद्र शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.inया संकेतस्थळावरील शिकाऊ उमेदवारी नोंदणी क्रमांक(Apprenticeship Registration Number) टाकावा. उदाहरणार्थ-A०३२२३५९५९ Pass@१२३ हा पासवर्ड टाकावा . Capcha टाकावा व लॉगिन या बटनावर क्लीक करावे.

१.७ लॉगिन झाल्यानंतर change password या बटनावर क्लीक करून शिकाऊ उमेदवारास स्वत:चा पासवर्ड स्थित करावा लागेल.

१.८ शिकाऊ उमेदवाराच्या भ्रमणध्वनी क्रमांक आणि ईमेलची "One Time Password" द्वारे खात्री करण्यात येईल.

१.९ लॉगिन झाल्यानंतर स्वत:ची वैयक्तिक माहिती तसेच शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेसंबंधित सर्व माहिती तपासावी उदा. संपूर्ण नाव (नाव,वडिलांचे/पतीचे नाव, आईचे नाव, आडनाव भ्रमणध्वनी क्रमांक, ईमेल, तसेच व्यवसायाचे नाव, व्यवसायाचा प्रकार [Designated/Optional/Technician(Votional)], शिकाऊ उमेदवारीचा कालावधी (पासून ते पर्यंत - महिने), प्रशिक्षित/अप्रशिक्षित,शिकाऊ उमेदवारी करार नोंदणी क्रमांक,आस्थापनेचे नाव,प्रतिमहा विद्यावेतनाचा विहीत दर, इत्यादी. [मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र (Basic Training & Related Instructions Centre - BTRIC) चे नाव दिलेल्या यादीतून निवडावे.

१.१० शिकाऊ उमेदवारास प्रत्यक्ष अदा केलेले विद्यावेतनाचे पुरावे तसेच शिकाऊ उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचा पुरावा (अधिवास प्रमाणपत्र, जन्म दाखला,शाळा सोडल्याचा दाखला),करार पत्र,इत्यादी संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच स्त्री उमेदवार विवाहित असल्यास तसेच तिचे आधार कार्ड व बँकेचे नाव बदललेले असल्यास त्यांनी अधिवास प्रमानपत्रासोबतच विवाहित असल्याचा पुरावा (विवाह प्रमाणपत्र) संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.

१.११ संकेतस्थळाकडून शिकाऊ उमेदवाराच्या सदरील दाव्याचा (Claim) एक ठराविक नोंदणी क्रमांक (Unique Id) तयार होईल.

१.१२ शिकाऊ उमेदवाराने दाव्याच्या नोंदणी क्रमांकावर क्लिक करुन आपण सादर केलेली माहिती पडताळावी.

१.१३ शिकाऊ उमेदवाराने सादर केलेली दाव्याची माहिती योग्य असल्यास "तपासले असता बरोबर आढळले" यावर क्लिक करावे आणि तद्नंतर "Submit" बटन वर क्लिक करावे.

१.१४ दाखल केलेल्या दाव्याची सद्य:स्थिती शिकाऊ उमेदवारास संकेतस्थळावर पडताळता येईल. (In Process/Verified/Processed)

१.१५ शिकाऊ उमेदवाराने संकेतस्थळावर दावा दाखल केलेल्या दिवसापासून पुढील पंचेचाळीस दिवसात अनुज्ञेय विद्यावेतनाच्या ७५ टक्के विद्यावेतन महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना राज्य शासनाकडून "थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer)" पद्धतीने अदा करण्यात येईल.

१.१६ शिकाऊ उमेदवारास विहीत मुदतीत सदरील लाभ प्राप्त न झाल्यास त्याने संकेतस्थळावरील Helpdesk च्या ईमेलवर दाव्याच्या संदर्भ क्रमांकासह तक्रार नोंदवावी.

## २. आस्थापनेने करावयाची कार्यवाही

२.१ महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना अतिरिक्त विद्यावेतनाचा लाभ प्राप्त होण्यासाठी आस्थापनांना केंद्र शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.in संकेतस्थळावर नोंदणी करावी लागेल तसेच राज्य शासनाच्या maps.dvet.gov.in संकेतस्थळावर लॉगिन  करणे अनिवार्य आहे.

२.२ राज्य शासनाच्या maps.dvet.gov.in संकेतस्थळावर लॉगिन येथे जाऊन आस्थापनेने,केंद्र शासनाच्या www.apprenticeshipindia.gov.inया संकेतस्थळावरील आस्थापनां नोंदणी क्रमांक(Establishment Registration Number) टाकावा. उदाहरणार्थ- E०३१७२७००६६९. Pass@१२३ हा पासवर्ड टाकावा . Capcha टाकावा व लॉगिन या बटनावर क्लीक करावे.

२.३ लॉगिन झाल्यानंतर change password या बटनावर क्लीक करून  आस्थापनांना स्वत:चा पासवर्ड स्थित करावा लागेल.

२.४ आस्थापनांनाच्या भ्रमणध्वनी क्रमांक आणि ईमेलची “One Time Password” द्वारे खात्री करण्यात येईल.

२.५ आस्थापनेने माहिती तपासावी. उदा. आस्थापनेचे नाव, पत्ता, आस्थापनेचा प्रकार ,कंपनीचा प्रकार नोंदणीचा प्रकार, जिल्हा, विभाग, ईमेल, संपर्कासाठी व्यक्तीचे नाव, पदनाम भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल, [मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र (Basic Training & Related Instructions Centre - BTRI) इत्यादी). संबंधित आस्थापनांनी त्यांच्या अखत्यारीतील शिकाऊ उमेदवारांचे अर्ज अर्ज तपासून शिकाऊ उमेदवाराचे प्रत्यक्ष अदा केलेले विद्यावेतनाचे पुरावे तसेच शिकाऊ उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचा पुरावा (अधिवास प्रमाणपत्र, जन्म दाखला,शाळा सोडल्याचा दाखला),करार पत्र इत्यादी ची तपासणी करणे अनिवार्य आहे. तसेच स्त्री उमेदवार विवाहित असल्यास तसेच तिचे आधार कार्ड व बँकेचे नाव बदललेले असल्यास त्यांनी अधिवास प्रमानपत्रासोबतच विवाहित असल्याचा पुरावा (विवाह प्रमानपत्र) इत्यादी तपासून Approve या बटनावर क्लीक करून  शासन निर्णयानुसार विद्यावेतन मिळण्यासाठी पात्र शिकाऊ उमेदवारांचे अर्ज पुढील तपासणीसाठी संबंधित प्रादेशिक कार्यालयास Approve बटनावर क्लिक करुन **प्रादेशिक कार्यालयां**स ऑनलाईन पद्धतीने सादर करावे.

२.६ विद्यावेतनाचे त्रुटीयुक्त दावे संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने सुयोग्य कारण नमूद करुन "Need for Rectification" बटनावर क्लिक करुन शिकाऊ उमेदवारांना परत पाठविण्यात  येतील.

२.७ विद्यावेतन अदा केल्याची त्रुटीयुक्त माहिती संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने सुयोग्य कारण नमूद करुन "Reject" बटनावर क्लिक करुन शिकाऊ उमेदवारांना परत पाठविण्यात येईल.

२.८ शिकाऊ उमेदवारांना अदा केलेल्या विद्यावेतनाची माहिती आस्थापनेकडून संकेतस्थळावर भरलेल्या दिवसापासून पुढील ४५ दिवसात अनुज्ञेय विद्यावेतनाव्यतिरिक्त केंद्र शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या मूळ विद्यावेतनाच्या दराच्या ७५ टक्के अतिरिक्त विद्यावेतन महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना राज्य शासनाकडून “थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer)” पद्धतीने अदा करण्यात येईल.

२.९ शिकाऊ उमेदवारास विहीत मुदतीत सदरील लाभ प्राप्त झाल्याची आस्थापनेने खात्री करावयाची आहे. शिकाऊ उमेदवारास विहीत मुदतीत सदरील लाभ प्राप्त न झाल्यास आस्थापनेने संकेतस्थळावरील Helpdesk च्या ईमेलवर तक्रार नोंदवावी.

## ३. प्रादेशिक कार्यालयांनी करावयाची कार्यवाही

३.१ निर्देशित (Designated) व्यवसायांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना राबविणाऱ्या इतर शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांसाठी तसेच वैकल्पिक (Optional) व्यवसायांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना राबविणाऱ्या शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनां साठी तसेच तंत्रज्ञ (व्यावसायिक) [Technician (Vocational)] व्यवसायांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजना राबविणाऱ्या केंद्र शासकीय आस्थापना तसेच केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील आस्थापना, चार किंवा त्यापेक्षा जास्त राज्यांमध्ये कार्यरत आस्थापनांसाठी " संबंधित प्रादेशिक कार्यालय (Concerned Regional office)" हे "क्षेत्रीय कार्यालय" असेल.

३.२ महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतनाचा लाभ अदा करण्याच्या कार्यवाहीसाठी क्षेत्रीय कार्यालयांना राज्य शासनाच्या maps.dvet.gov.in संकेतस्थळावर स्वतंत्र "लॉग इन आयडी" पुरविण्यात येतील.

३.३ क्षेत्रीय कार्यालयांच्या अखत्यारीत येणाऱ्या आस्थापनांमधील शिकाऊ उमेदवारांचे विद्यावेतनाचे दावे तसेच आस्थापनांची तद्अनुषंगिक माहिती संकेतस्थळावर लॉगइन केल्यावर क्षेत्रीय कार्यालयांना दिसेल.

३.४ सदरील दावे आणि आस्थापनांकडून प्राप्त झालेल्या तद्अनुषंगिक माहितीची पडताळणी करुन ते बरोबर असल्यास योग्य दावे "संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई" यांचेकडे संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने "Submit" बटनावर क्लिक करुन पाठविण्यात येतील.

३.५ विद्यावेतनाचे त्रुटीयुक्त दावे संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने सुयोग्य कारण नमूद करुन " Need for Rectification " बटनावर क्लिक करुन शिकाऊ उमेदवारांना परत पाठविण्यात येतील.

३.६ विद्यावेतन अदा केल्याची त्रुटीयुक्त माहिती संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने सुयोग्य कारण नमूद करुन "Reject" बटनावर क्लिक करुन शिकाऊ उमेदवारांना परत पाठविण्यात येईल.

३.७ "संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई" यांचेकडे संकेतस्थळावरुन ऑनलाईन पद्धतीने पाठविलेल्या दाव्यांची सद्य:स्थिती क्षेत्रीय कार्यालयास संकेतस्थळावर पडताळता येईल. Reject/Approved/Need Rectification)

३.८ शिकाऊ उमेदवाराचे प्रत्यक्ष अदा केलेले विद्यावेतनाचे पुरावे तसेच शिकाऊ उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचा पुरावा (अधिवास प्रमाणपत्र ),करार पत्र इत्यादी ची तपासणी करणे अनिवार्य आहे. तसेच **स्त्री उमेदवार विवाहित असल्यास** तसेच **तिचे आधार कार्ड व बँकेचे नाव बदललेले असल्यास तर त्यांनी अधिवास प्रमानपत्रासोबतच विवाहित असल्याचा पुरावा (विवाह** प्रमाणपत्र) **जोडणे आवश्यक राहील.**

३.९ ज्या शिकाऊ उमेदवारांना पुर्ण प्रशिक्षण कालावधीचे विद्यावेतन **लाभ यापूर्वी** अदा करण्यांत आलेले आहे, त्यांनी जर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केला असेल तर तो प्रादेशिक कार्यालयाच्या स्तरावर नाकारण्यांत यावा व ज्या उमेदवारांना काही महिन्याचे विद्यावेतन अदा केलेले आहे व काही महिन्याचे विद्यावेतन अदा करणे प्रलंबित आहे, त्यांना फक्त प्रलंबित महिन्याचे विद्यावेतन मंजूर करण्यांत यावे. सदर बाबत योग्य ती तपासणी करुन कोणत्याही शिकाऊ उमेदवाराची व्दिरुक्त नोंद (Duplicate Entry) होणार नाही, याची संबंधित प्रादेशिक कार्यालयाने दक्षता घेण्यांत यावी.

३.१० **महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना राज्य शासनाकडून मिळणाऱ्या लाभासाठी शिकाऊ उमेदवाराने नियमानुसार शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण एकाच आस्थापनेत विहित मुदतीत पूर्ण करणे अनिवार्य आहे.**

## ४. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई कार्यालयाने करावयाची कार्यवाही

४.१ महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतनाचा लाभ अदा करण्याच्या कार्यवाहीसाठी "संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई" या कार्यालयास राज्य शासनाच्या maps.dvet.gov.in संकेतस्थळावर स्वतंत्र "लॉग इन आयडी" पुरविण्यात येईल.

४.२ शिकाऊ उमेदवारांचे विद्यावेतनाचे दावे तसेच आस्थापनांची तद्अनुषंगिक माहिती संकेतस्थळावर लॉगइन केल्यावर "संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई" या कार्यालयास दिसेल.

४.३ संचालनालयाने प्रादेशिक कार्यालयाकडून मान्यतेसह प्राप्त झालेले सदरील दावे एकत्रित करून देयके तयार करून कोषागारा कडून नियमानुसार विहित पद्धतीने पारित करून घ्यावीत.

४.४ देयके पारित झाल्यानंतर सर्व शिकाऊ उमेदवारांना त्यांनी नमूद केलेल्या बँक खात्यावर "थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) पद्धतीने विद्यावेतनाची रक्कम अदा करण्यात येईल.

**शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना विहीत केलेल्या विद्यावेतनाच्या 75 टक्के विद्यावेतन महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना राज्य शासनाकडून "थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer)" पद्धतीने अदा करण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती (Standard Operating Procedure)**

१)विद्यावेतनाचा लाभ हा माहे ३ जून २०२१ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत वार्षिक हप्त्यात देण्यात यावा.

२) शिकाऊ उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा . तसेच आस्थापनादेखील महाराष्ट्रातील असावी. स्त्री उमेदवार विवाहित असल्यास तसेच तिचे आधार कार्ड व बँकेचे नाव बदललेले असेल तर त्यांनी अधिवास प्रमानपत्रासोबतच विवाहित असल्याचा पुरावा (विवाह प्रमानपत्र) जोडणे आवश्यक राहील.

३)शिकाऊ उमेदवारा चे बँकेत आधार संलग्न खाते **(Adhar Seeded)** असने आवश्यक आहे.

४)शिकाऊ उमेदवाराची www.apprenticeshipindia.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करुन करार पत्र तयार करण्यात आलेले असावे .

५) महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत सर्व शिकाऊ उमेदवारांना राज्य शासनाकडून मिळणार लाभ हा समान तत्वावर अनुज्ञेय आहे.

६) महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना राज्य शासनाकडून मिळणाऱ्या लाभासाठी शिकाऊ उमेदवाराने नियमानुसार शिकाऊ उमेदवारीचे प्रशिक्षण एकाच आस्थापनेत विहित मुदतीत पूर्ण करणे अनिवार्य आहे.

७) सदरहू योजनेचा लाभ देण्यासाठी संकेत स्थळावर शिकाऊ उमेदवारांची नोंदणी करून घेण्याची जबाबदारी जवाबदारी ही संबंधित मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र (Basic Training & Related Instructions Centre - BTRI) सोपविण्यात येत आहे.

८) मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र यांनी सर्व शिकाऊ उमेदवारांची maps.dvet.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करून घ्यावी.

९) संबंधित आस्थापनांनी त्यांच्या अखत्यारीतील शिकाऊ उमेदवारांचे अर्ज तपासून सदर शिकाऊ उमेदवारांचे बँक खात्यात विद्यावेतन जमा केल्याचा पुरावा याची तपासणी करावी व शासन निर्णयानुसार विद्यावेतन मिळण्यासाठी पात्र शिकाऊ उमेदवारांचे अर्ज पुढील तपासणीसाठी संबंधित प्रादेशिक कार्यालयास ऑनलाईन पद्धतीने सादर करावे.

१०)संबंधित प्रादेशिक कार्यालयाने शिकाऊ उमेदवाराचे प्रत्यक्ष अदा केलेले विद्यावेतनाचे पुरावे तसेच शिकाऊ उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याचा पुरावा (अधिवास प्रमाणपत्र, जन्म दाखला,शाळा सोडल्याचा दाखला),करार पत्र इत्यादी ची तपासणी करणे अनिवार्य आहे. तसेच स्त्री उमेदवार विवाहित असल्यास तसेच तिचे आधार कार्ड व बँकेचे नाव बदललेले असल्यास त्यांनी अधिवास प्रमानपत्रासोबतच विवाहित असल्याचा पुरावा (विवाह प्रमाणपत्र) जोडणे आवश्यक राहील.

११)ज्या शिकाऊ उमेदवारांना पुर्ण प्रशिक्षण कालावधीचे विद्यावेतन लाभ यापूर्वी ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यांत आलेले आहे, त्यांनी जर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर केला असेल तर तो प्रादेशिक कार्यालयाच्या स्तरावर नाकारण्यांत यावा व ज्या उमेदवारांना काही महिन्याचे विद्यावेतन अदा केलेले आहे व काही महिन्याचे विद्यावेतन अदा करणे प्रलंबित आहे, त्यांना फक्त प्रलंबित महिन्याचे विद्यावेतन मंजूर करण्यांत यावे. सदर बाबत योग्य ती तपासणी करुन कोणत्याही शिकाऊ उमेदवाराची व्दिरुक्त नोंद (Duplicate Entry) होणार नाही, याची संबंधित प्रादेशिक कार्यालयाने दक्षता घेण्यांत यावी

१२)संबंधित प्रादेशिक कार्यालयाने त्यांच्या अखत्यारीतील शिकाऊ उमेदवारांचे अर्ज तपासून शासन निर्णयानुसार विद्यावेतन मिळण्यासाठी पात्र शिकाऊ उमेदवारांचे अर्ज पुढील कार्यवाहीसाठी संचालनालयास सादर करावे.

१३) संचालनालयाने प्रादेशिक कार्यालयाकडून मान्यतेसह प्राप्त झालेले अर्ज एकत्रित करून देयके तयार करून कोषागारा कडून नियमानुसार विहित पद्धतीने पारित करून घ्यावीत.

१४) देयके पारित झाल्यानंतर सर्व शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतन NEFT द्वारे संबंधित शिकाऊ उमेदवाराच्या आधार संलग्नित बँक खात्या मध्ये जमा करण्यात यावे.